# <u>महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांच्या आस्थापनेवर लघुलेखक (श्रेणी-3), कनिष्ठ लिपिक आणि शिपाई/हमाल या पदांच्या भरतीसाठी जाहिरात</u>

**1.** महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्हा न्यायालयांच्या आस्थापनेवर लघुलेखक (श्रेणी-3), कनिष्ठ लिपिक आणि शिपाई/हमाल या पदांसाठी उमेदवारांच्या निवड यादया आणि प्रतिक्षा यादया तयार करण्यासाठी ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून खालीलप्रमाणे ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. :

| अ. क्र. | तपशील | लघुलेखक (श्रेणी-3) | कनिष्ठ लिपिक | शिपाई/हमाल |
|---|---|---|---|---|
| 1 | निवड यादी | 568 | 2795 | 1266 |
| 2 | प्रतिक्षा यादी* | 146 | 700 | 318 |
| 3 | वेतनश्रेणी | वेतन स्तर एस-14: (38600-122800) | वेतन स्तर एस-6 : (19900-63200) | वेतन स्तर एस-1: (15000-47600) |
| 4 | पात्रता | **अ)** पात्रता- पान क्रमांक 2 वर मुद्दा क्रमांक 2 वर दिलेला आहे.<br>**ब)** <u>सर्व पदांसाठी</u> :-<br>(i) <u>वय</u><br>अ) शासनाने निर्दिष्ट केल्यानुसार, सर्वसाधारण प्रवर्गाच्या बाबतीत वय 18 वर्षांपेक्षा कमी आणि 38 वर्षांपेक्षा जास्त नसावे आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत 43 वर्षांपेक्षा जास्त नसावे.<br>आ) योग्य मार्गाने अर्ज करणाऱ्या राज्य/केंद्र सरकारी कर्मचाऱ्याच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा लागू असणार नाही.<br>(ii) उमेदवारास 28.03.2006 नंतर जन्मलेल्या हयात मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.<br>(iii) जर उमेदवारास नैतिक अध:पतनाचा समावेश असलेल्या गुन्हयासाठी शिक्षा झाली असेल किंवा त्याला/तिला उच्च न्यायालय/जिल्हा न्यायालय किंवा संघ लोकसेवा आयोग किंवा इतर कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्याद्वारे घेतलेल्या परीक्षेस बसण्यापासून कायमची मनाई केली असेल किंवा निवडीसाठी प्रतिबंधित ठरविले असेल तर तो / ती नियुक्तीसाठी पात्र असणार नाही. | | |

RojgarMarathi.Com

**<u>टीप:</u>**

1. दिव्यांग व्यक्तिंकरीता आरक्षणासाठी दाखल केलेल्या रिट याचिका (एल) क्र. 1137/2018 सह जनहित याचिका क्रमांक 72/2018 मध्ये दिलेल्या निर्देशानुसार अपंग व्यक्तिंसाठी 4% पदे राखीव ठेवली आहेत. दिव्यांग व्यक्तिंसाठीची पदे, या पदांसाठी दिव्यांगत्वाचा योग्य प्रवर्ग निश्चित केल्यानंतर, अधिसूचित केल्या जाणाऱ्या दिव्यांग व्यक्तिंसाठीची पदे उच्च न्यायालयाच्या अधिसूचनेनुसार नजीकच्या भविष्यात भरली जातील.
2. जिल्हानिहाय निवड यादी आणि प्रतिक्षा यादी परिशिष्ट-"अ" येथे दिली आहे.
3. उमेदवारांनी सामान्य सूचना आणि इतर तपशील (यापुढे नमूद केलेले) काळजीपूर्वक वाचावे आणि ऑनलाइन अर्ज भरण्यापूर्वी त्याचे पालन करावे.

* उच्च न्यायालयाच्या दिनांक 19.08.2023 च्या अधिसूचनेनुसार प्रतिक्षा यादी.

**2. पात्रता :-**

| | |
|---|---|
| **लघुलेखक (श्रेणी - 3)** | पात्र होण्यासाठी उमेदवाराने -<br>(अ) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी घेतलेली असणे आवश्यक आहे. (कायद्याची पदवी धारण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल)<br>(आ) त्यास जिल्हयातील न्यायालयाच्या प्रादेशिक भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>(इ) सरकारी व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा सरकारी मंडळाद्वारे घेतलेली परीक्षा किंवा संगणक टंकलेखन बेसिक कोर्स यामध्ये सरकारी प्रमाणपत्र (GCC-TBC किंवा I.T.I.) - यामध्ये<br>- इंग्रजी लघुलेखन 100 श. प्र. मि. किंवा त्याहून अधिक गती आणि मराठी लघुलेखन 80 श. प्र. मि. किंवा त्याहून अधिक गती आणि<br>- इंग्रजी टंकलेखन 40 श. प्र. मि. किंवा त्याहून अधिक गती आणि मराठी टंकलेखन 30 श. प्र. मि. किंवा त्याहून अधिक गती असणे आवश्यक आहे.<br>(ई) खालीलपैकी कोणत्याही संस्थेतून प्राप्त M.S.Office, M.S.Word, Wordstar-7 आणि Open Office Org. या व्यतिरिक्त Windows आणि Linux मध्ये Word Processor चालवण्यामध्ये प्राविण्याबद्दल संगणक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>i) महाराष्ट्र किंवा गोवा राज्यातील वैधानिक विद्यापीठे, यथास्थिती.<br>ii) महाराष्ट्र किंवा गोवा राज्य तंत्र शिक्षण मंडळ, यथास्थिती.<br>iii)NIC, DOEACC, APTECH, NIIT, C-DAC, DATAPRO, SSI, BOSTON, CEDIT, M. S. CIT.<br>iv)महाराष्ट्र किंवा गोवा सरकारने जारी केलेले संगणक ज्ञानाच्या पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, यथास्थिती. |
| **कनिष्ठ लिपिक** | पात्र होण्यासाठी उमेदवाराने -<br>(अ) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी घेतलेली असणे आवश्यक आहे. (कायद्याची पदवी धारण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल)<br>(आ) त्यास जिल्हयातील न्यायालयाच्या प्रादेशिक भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.<br>(इ) सरकारी व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा सरकारी मंडळाद्वारे घेतलेली परीक्षा किंवा संगणक टंकलेखन बेसिक कोर्स यामध्ये सरकारी प्रमाणपत्र (GCC-TBC किंवा I.T.I.) - यामध्ये इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि. किंवा त्याहून अधिक गती आणि मराठी टंकलेखन 30 श.प्र.मि. किंवा त्याहून अधिक गती.<br>(ई) खालीलपैकी कोणत्याही संस्थेतून प्राप्त M.S.Office, M.S.Word, Wordstar-7 आणि Open Office Org. या व्यतिरिक्त Windows आणि Linux मध्ये Word Processor चालवण्यामध्ये प्राविण्याबद्दल संगणक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.<br>i) महाराष्ट्र किंवा गोवा राज्यातील वैधानिक विद्यापीठे, यथास्थिती.<br>ii) महाराष्ट्र किंवा गोवा राज्य तंत्र शिक्षण मंडळ, यथास्थिती.<br>iii) NIC, DOEACC, APTECH, NIIT, C-DAC, DATAPRO, SSI, BOSTON, CEDIT, M. S. CIT.<br>iv) महाराष्ट्र किंवा गोवा सरकारने जारी केलेले संगणक ज्ञानाच्या पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, यथास्थिती. |
| **शिपाई/हमाल** | उमेदवाराने किमान 7 वी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी आणि त्याची शरीरयष्टी चांगली असावी. |

RojgarMarathi.com

**3. प्रत्येक पदासाठी अर्ज शुल्क :-**

| | |
|---|---|
| सर्वसाधारण प्रवर्गासाठी | रु. 1,000/- |
| शासनाने निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय किंवा विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी | रु. 900/- |
| **टीप: भरलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.** | |

**4. परीक्षा :-**

| चाचणी परीक्षेचे नाव | लघुलेखक (श्रेणी - 3) | कनिष्ठ लिपिक | शिपाई/ हमाल |
|---|---|---|---|
| | गुण | गुण | गुण |
| चाळणी परीक्षा | * | 40 | 30 |
| इंग्रजी लघुलेखन चाचणी | 20 | लागू नाही | लागू नाही |
| मराठी लघुलेखन चाचणी | 20 | लागू नाही | लागू नाही |
| इंग्रजी टंकलेखन चाचणी | 20 | 20 | लागू नाही |
| मराठी टंकलेखन चाचणी | 20 | 20 | लागू नाही |
| स्वच्छता आणि चापल्यता चाचणी | लागू नाही | लागू नाही | 10 |
| मुलाखत | 20 | 20 | 10 |
| एकूण गुण | 100 | 100 | 50 |

* उच्च न्यायालयाने, लघुलेखक (श्रेणी - 3) पदासाठी चाळणी परीक्षा घेण्याचा अधिकार (कनिष्ठ लिपिक पदासाठीच्या चाळणी परीक्षेप्रमाणे) प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार राखून ठेवला आहे.

** इतिहास, नागरिकशास्त्र, विज्ञान, भूगोल, क्रीडा, साहित्य, व्याकरण आणि चालू घडामोडीच्या ज्ञानासह सामान्य ज्ञानाच्या चाचणीसाठी कनिष्ठ लिपिक आणि शिपाई/हमाल यांच्यासाठी चाळणी परीक्षा खालीलप्रमाणे घेतली जाईल.

| अ. क्र. | पद | एकूण गुण | प्रश्नांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ लिपिक | 40 | 40 बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रकारचे इंग्रजी/मराठी भाषेतील प्रश्न |
| 2 | शिपाई/ हमाल | 30 | 30 बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रकारचे इंग्रजी/मराठी भाषेतील प्रश्न |

*** कनिष्ठ लिपिक पदासाठीच्या चाळणी परीक्षेमध्ये संगणक ज्ञानावरील प्रश्नांचाही समावेश केला जाईल.**

RojgarMarathi.Com

**लघुलेखक (श्रेणी - 3) पदासाठी परीक्षेचा तपशील :**

1. लघुलेखक (श्रेणी - 3) या पदासाठी चाळणी परीक्षा घेण्यात आली नाही तर, सर्व पात्र उमेदवारांना खाली नमूद केलेल्या लघुलेखन चाचणीसाठी बोलावले जाईल.
2. चाळणी परीक्षेमध्ये किमान गुण प्राप्त केल्यानंतर (कनिष्ठ लिपिक पदासाठीच्या चाळणी परीक्षेप्रमाणे घेण्यात आल्यास) काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या सातपट उमेदवारांना खाली नमूद केलेल्या लघुलेखन चाचणीसाठी बोलावले जाईल. 1:7 गुणोत्तर राखण्यासाठी अल्पसुचीमधील शेवटच्या उमेदवाराने मिळवलेल्या गुणांइतके गुण एकापेक्षा जास्त उमेदवारांनी मिळवले असतील तर, अशा सर्व उमेदवारांना लघुलेखन चाचणीसाठी उपस्थित राहण्यासाठी बोलावले जाईल.

| अ. क्र. | भाषा | श्रुतलेखनाचा कालावधी | श्रुतलेखनाची गती | एकूण शब्द | प्रतिलेखन वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | इंग्रजी | 6 मिनिटे | 100 शब्द प्रति मिनिट | 600 | 40 मिनिटे |
| 2 | मराठी | 8 मिनिटे | 80 शब्द प्रति मिनिट | 640 | 45 मिनिटे |

3. लघुलेखन चाचणीमध्ये किमान गुण प्राप्त केल्यानंतर, उमेदवाराला संगणकावर 10 मिनिटात (गती 30 शब्द प्रति मिनिट) टंकलिखित करावयाच्या 300 शब्दांच्या 20 गुणांच्या मराठी टंकलेखन परीक्षेला उपस्थित राहावे लागेल.
4. ज्या उमेदवारांना मराठी टंकलेखन चाचणीमध्ये किमान गुण मिळतील त्यांनाच इंग्रजी टंकलेखन चाचणीला बसण्यास पात्र मानले जाईल.
5. इंग्रजी टंकलेखन चाचणी 20 गुणांची असेल, ज्यात 400 शब्दांचा समावेश असेल ते उमेदवारांना संगणकावर 10 मिनिटांच्या आत (गती 40 श. प्र. मि.) टंकलिखित करायचे आहे.
6. जे उमेदवार इंग्रजी टंकलेखनामध्ये किमान गुण मिळवतील त्यांनाच मुलाखतीसाठी पात्र मानले जाईल.
7. प्रत्येक परीक्षा घेतल्यानंतर, पुढील चाचणीसाठी पात्र उमेदवारांची यादी संबंधित जिल्हा न्यायालयांच्या सूचना फलकावर आणि संबंधित जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल.
8. चाळणी परीक्षा (घेतल्यास) इंग्रजी लघुलेखन चाचणी, मराठी लघुलेखन चाचणी, मराठी टंकलेखन चाचणी आणि इंग्रजी टंकलेखन चाचणीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे, काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे, जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांच्या 3 पट उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. 1:3 गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने मिळविलेल्या गुणांइतकेच गुण मिळविणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

**कनिष्ठ लिपिक पदासाठी परीक्षेचा तपशील :**

1. चाळणी परिक्षेमध्ये किमान गुण मिळविल्यानंतर, काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या सातपट उमेदवारांना संगणकावर 10 मिनिटांत (गती 30 श.प्र.मि.) टंकलिखित करावयाच्या 300 शब्दांच्या 20 गुणांची मराठी टंकलेखन चाचणीसाठी बोलावले जाईल. 1:7 गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने मिळविलेल्या गुणांइतकेच गुण मिळविणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मराठी टंकलेखन परीक्षेसाठी बोलावले जाईल.

RojgarMarathi.Com

2. मराठी टंकलेखन चाचणीमध्ये किमान गुण मिळवणारे उमेदवार इंग्रजी टंकलेखन चाचणीला बसण्यास पात्र असतील.
3. इंग्रजी टंकलेखन चाचणी 20 गुणांची असेल, ज्यात 400 शब्दांचा समावेश असेल ते उमेदवारांना संगणकावर 10 मिनिटांच्या आत (गती 40 श. प्र. मि.) टंकलिखित करायचे आहे.
4. जे उमेदवार इंग्रजी टंकलेखन चाचणीमध्ये किमान गुण मिळवतील त्यांना मुलाखतीसाठी पात्र मानले जाईल.
5. प्रत्येक परीक्षा घेतल्यानंतर पुढील चाचणीसाठी पात्र उमेदवारांची यादी संबंधित जिल्हा न्यायालयांच्या सूचना फलकावर व संबंधित जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल.
6. चाळणी परीक्षा, मराठी टंकलेखन चाचणी आणि इंग्रजी टंकलेखन चाचणीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे, काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे, जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदांच्या संख्येच्या 3 पट उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. 1:3 गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने मिळविलेल्या गुणांइतकेच गुण मिळविणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

**<u>शिपाई/हमाल पदासाठी परीक्षेचा तपशील :</u>**

1. चाळणी परीक्षेमध्ये किमान गुण मिळविल्यानंतर, काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाच्या सातपट उमेदवारांना स्वच्छता आणि चापल्यता चाचणीसाठी बोलावले जाईल. 1:7 गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने मिळविलेल्या गुणांइतकेच गुण मिळविणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना स्वच्छता आणि चापल्यता चाचणीसाठी बोलावले जाईल.
2. जे उमेदवार स्वच्छता आणि चापल्यता चाचणीमध्ये किमान गुण मिळवतील त्यांना मुलाखतीसाठी पात्र धरले जाईल.
3. प्रत्येक परीक्षा घेतल्यानंतर, जे पात्र उमेदवार असतील त्यांची यादी ही संबंधित जिल्हा न्यायालयाच्या सूचना फलकावर आणि संबंधित जिल्हा न्यायालय व उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित केली जाईल.
4. चाळणी परीक्षा आणि स्वच्छता आणि चापल्यता चाचणीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे, काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे, जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या संख्येच्या 3 पट उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. 1:3 हे गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने मिळवलेल्या गुणांइतकेच गुण मिळवणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल.

RojgarMarathi.Com

**<u>प्रत्येक परीक्षा उत्तीर्ण होण्याचे निकष :</u>**

लघुलेखक (श्रेणी-3), कनिष्ठ लिपिक आणि शिपाई/ हमाल च्या पदानुसार चाळणी परीक्षा, लघुलेखन चाचणी, टंकलेखन चाचणी, स्वच्छता आणि चापल्यता चाचणी आणि मुलाखतीसाठी सामान्य प्रवर्गासाठी 35% गुण असतील आणि शासनाने निर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग किंवा विशेष मागास वर्गातील उमेदवारांना त्यामध्ये 5% गुणांची सूट दिली जाईल.

## 5. सर्व उमेदवारांसाठी सामाईक सूचना :-

अ) ऑनलाइन अर्ज भरण्याची लिंक आणि जाहिरात मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर म्हणजेच https://bombayhighcourt.nic.in येथे उपलब्ध आहे.

आ) ऑनलाइन अर्ज सादर करण्याची लिंक ही दिनांक **04/12/2023** रोजी सकाळी 11.00 वाजता उघडेल आणि दिनांक **18/12/2023** रोजी संध्याकाळी 6.00 वाजता बंद होईल. शेवटच्या क्षणाची घाई टाळण्यासाठी उमेदवारांना सल्ला देण्यात येतो की उमेदवारांनी अर्ज पुरेश्या वेळेआधी भरावा.

इ) ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरवात करण्यापूर्वी उमेदवाराकडे ज्यावर पत्रव्यवहार केला जाईल असा त्याचा/तिचा वैध/अचूक ई-मेल पत्ता, नोंदणीकृत मोबाईल क्रमांक धारण केलेला असावा, तसेच अद्ययावत पासपोर्ट आकाराचा फोटो आणि स्वाक्षरी स्कॅन करून किमान 80KB व कमाल 100KB पेक्षा जास्त होणार नाही अशा स्वतंत्र फाईल्स .jpg/.jpeg format मध्ये तयार करून ऑनलाईन अर्जात उचित स्थानी सदर फोटो आणि स्वाक्षरी अपलोड करावे.

ई) अपूर्ण अर्ज किंवा असे अर्ज जे उमेदवाराने सादर केलेल्या माहितीच्या आधारेभरलेले आहेत आणि ते अर्ज त्याला किंवा तिला पदासाठी अपात्र ठरवित असतील, ते स्विकारले जाणार नाहीत.

उ) अर्ज पोस्ट/ हस्ते किंवा कुरियरद्धारे स्विकारले जाणार नाहीत.

ऊ) उमेदवाराने त्याला/तिला अटक झाली आहे किंवा स्थानबद्ध करण्यात आले आहे किंवा कोणत्याही गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात आले आहे किंवा त्याच्याविरुद्ध/तिच्याविरुद्ध एफ.आय.आर./फौजदारी तक्रार प्रलंबित आहे किंवा फौजदारी खटल्यामध्ये निकाल दिला आहे किंवा तो/ती शिस्तभंगाविषयकच्या चौकशीला सामोरे जात आहे किंवा त्यामध्ये त्याला/तिला दोषी ठरविण्यात आले आहे किंवा कसे, याबाबत माहिती द्यावी.

ए) जे उमेदवार आधीपासूनच सरकारी सेवेत आहेत त्यांनी त्यांच्या विभागाकडून "ना हरकत प्रमाणपत्र" घ्यावे की, त्यांच्या उमेदवारीचा विचार होण्यास विभागास कोणतीही हरकत नाही. त्यानंतर, मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी, मुलाखतीच्या वेळेस हे प्रमाणपत्र सादर करावे.

ऐ) उमेदवार प्रत्येक पदासाठी एक अर्ज त्यासाठीच्या शुल्कासह सादर करू शकतो. एकाच पदासाठी शुल्कासह अनेक अर्ज सादर केल्यास उमेदवाराने सादर केलेला शेवटचा अर्जच ग्राह्य धरला जाईल.

ओ) ऑन-लाइन अर्ज भरताना उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई आणि लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्या आस्थापनेवर चतुर्थ श्रेणी संवर्गात 'हमाल' हे पद आहे आणि 'शिपाई' हे पद नाही, तर इतर सर्व आस्थापनेवर चतुर्थ श्रेणी संवर्गात 'शिपाई' हे पद आहे आणि 'हमाल' हे पद नाही.

जर एखाद्या उमेदवाराने 'शिपाई'/ 'हमाल' या पदासाठी अर्ज केला आणि नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई आणि लघुवाद न्यायालय, मुंबई यांच्या आस्थापनेची निवड करण्याचा पर्याय दिला, तर त्याचा/तिचा अर्ज 'हमाल' या पदासाठी विचारात घेतला जाईल आणि 'शिपाई' पदासाठी नाही. इतर सर्व आस्थापनांसाठी जर एखाद्या उमेदवाराने 'शिपाई'/'हमाल' या पदासाठी अर्ज केला, तर त्याचा/तिचा अर्ज फक्त 'शिपाई' या पदासाठी विचारात घेतला जाईल.

औ) उमेदवाराने, शासनाने निर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास वर्गातील उमेदवार म्हणून किंवा सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार म्हणून विचार केला पाहिजे की नाही हे नमूद करावे.

उमेदवाराने, शासनाने निर्दिष्ट केल्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा विशेष मागास वर्गासाठी विचार करण्याचा पर्याय स्वीकारल्यास, मुलाखतीच्या वेळी त्याला/तिला संबंधित प्रवर्गात विचार करण्यास हक्कदार होण्यासाठी प्रमाणपत्र सादर करावे व तसे प्रमाणपत्र सादर

न केल्यास, त्यांना चुकीची माहिती सादर केल्याबद्दल अपात्र ठरविले जाईल आणि तसेच सर्वसाधारण प्रवर्गात त्याचा विचार केला जाणार नाही.

अं) उच्च न्यायालय, कोणतीही जिल्हा न्यायालये किंवा तालुका न्यायालये यांच्याकडून कोणत्याही अर्जासंदर्भात कोणतीही चौकशी विचारार्थ घेतली जाणार नाही. सविस्तर जाहिरातीची लिंक निष्प्रभ होईपर्यंत केवळ तांत्रिक बाबींसंबंधी चौकशी, कार्यालयीन वेळेत, ऑनलाइन तक्रार पोर्टलवर करता येऊ शकेल.

अ:) उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, त्यांनी दिलेली माहिती खरी आहे असा विश्वास ठेवून त्यांच्या पात्रतेचे मूल्यमापन केले जाईल. जर कोणत्याही उमेदवाराने खोटी, सदोष किंवा चुकीची माहिती दिल्याचे आढळल्यास अशा उमेदवाराला अपात्र तर ठरवले जाईलच, शिवाय त्यास अभियोगास तोंड द्यावे लागेल. अशा उमेदवारांना उच्च न्यायालय किंवा जिल्हा न्यायालयांतर्गत कोणत्याही परीक्षेत, कोणत्याही पदांकरीता अर्ज करण्यासाठी मनाई केली जाईल.

क) अर्हताकारी सेवाप्रवेश परीक्षेसाठी उमेदवारांची अल्पसूची बनवण्यासाठी समुचित पद्धतीचा अवलंब करण्याचे सर्व अधिकार उच्च न्यायालय राखून ठेवत आहे. उच्च न्यायायलय परीक्षेचे प्रकार, रिक्त पदांची स्थिति, निवड प्रक्रियेच्या पद्धतीत बदल करणे, परीक्षा पुढे ढकलणे, परीक्षा रद्द करणे याबाबत किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या कारणाबाबत अधिकार राखून ठेवत आहे. याबाबत कोणत्याही उमेदवाराला कोणत्याही प्रकारच्या दाव्यासंदर्भात प्रश्न विचारण्याचा अधिकार असणार नाही. त्यामुळे अल्पसूची संबंधी कोणतेही अभिवेदन उच्च न्यायालयद्वारा विचारार्थ घेतले जाणार नाही.

ख) उमेदवारांना प्रत्येक परीक्षा आणि मुलाखती करिता, दिलेल्या सूचित तारखांना, स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

ग) ज्या उमेदवाराला मुलाखतीसाठी बोलावले जाईल, त्याने मुलाखतीच्या वेळी खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती व अर्ज केलेल्या पदानुसार त्यांच्या मूळ प्रती पडताळणीच्या उद्देशाने जिल्हा न्यायालयाच्या संबंधित प्रबंधकांकडे सादर करणे आवश्यक आहे:-

i) जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म दाखला/ माध्यमिक शाळा प्रमाणपत्र).

ii) अर्हता परीक्षा/ पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

iii) अर्हता परीक्षा/पदवी परीक्षा मध्ये मिळवलेल्या गुणांची गुणपत्रिका.

iv) दोन सन्माननीय व्यक्तिंनी दिलेली चारित्र्य प्रमाणपत्रे, त्यांचे नाव, पदनाम आणि पूर्णपत्ता पत्त्यासह, जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस किंवा नंतर दिलेले, उमेदवाराचे नैतिक चारित्र्य चांगले असल्याचे प्रमाणित करणारे, या जाहिराती बरोबर दिलेल्या विहित नमुन्यात दिलेले.

v) पात्रतेच्या निकषात नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ/ संस्थेने जारी केलेले संगणक संचालनातील विहित ज्ञानाविषयीचे प्रमाणपत्र.

vi) पात्रता निकषात नमूद केल्याप्रमाणे शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र राज्य किंवा शासकीय मंडळ किंवा आय.टी.आय.ने जारी केलेले इंग्रजी व मराठी शॉर्टहँड/टायपिंगमधील आवश्यक गतीचे प्रमाणपत्र.

vii) शासनाने विहित केलेल्या प्राधिकाऱ्याकडून निर्गमित केलेला जातीचा दाखला, जिथे लागू असेल तेथे.

viii) उमेदवार राज्य/केंद्र सरकारच्या सेवेत असल्यास संबंधित विभागाकडून "ना हरकत प्रमाणपत्र”.

ix) अनुभव प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे, असल्यास.

x) विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नाव बदलले असेल तर तिचे नाव बदलण्या संदर्भातील कागदपत्रे, जसे की शासकीय राजपत्र/ सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

xi) इतर कोणतीही कागदपत्रे, जर जिल्हा न्यायालय आस्थापनेने मागितल्यास.

RojgarMarathi.com

घ) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर आणि सबमिट केल्यानंतर उमेदवारांनी ऑनलाइन पावती, तसेच संपूर्ण अर्जाची प्रिंटआऊट प्राप्त करावी. उमेदवार त्यांचे नोंदणीकृत लॉग-इन युजरनेम आणि पासवर्ड वापरून त्यांचे हॉल तिकीट डाउनलोड करू शकतात. उमेदवाराने ऑनलाइन अर्ज सबमिट करण्याच्या टप्प्यावर, योग्य रितीने भरलेल्या ऑनलाइन अर्जाची प्रिंटआऊट किंवा कोणतेही दाखले, कागदपत्रे, प्रमाणपत्रांच्या मूळ किंवा सांक्षाकित प्रती, संबंधित जिल्हा न्यायालय किंवा उच्च न्यायालयात पोस्टाने किंवा हस्ते पाठवू नयेत. उमेदवाराने उच्च न्यायालय/ जिल्हा न्यायालयांच्या आस्थापना जेव्हा मागणी करतील तेव्हा कागदपत्रांच्या सदर प्रिंटआऊट आणि प्रती (मूळ/सांक्षाकित) सादर कराव्यात.

च) भरती प्रक्रियेचे वेळापत्रक उच्च न्यायालय/जिल्हा न्यायालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटना सापेक्ष असेल. असा बदल वेळोवेळी संबंधित जिल्हा न्यायालयांच्या सूचना फलकांवर अधिसूचित केला जाईल आणि उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित केला जाईल.

छ) निवड समितीचे सदस्य, जिल्हा न्यायालये/उच्च न्यायालयात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी किंवा या निवड प्रक्रियेसंदर्भात उच्च न्यायालयाने स्वत:हून किंवा इतर कोणाच्याही माध्यमातून सेवा घेतलेला कोणताही त्रयस्थ पक्ष यांना व्यक्तीशः अथवा इतर कोणामार्फत भेटण्याचा किंवा प्रभावित करण्याचा किंवा दबाव टाकण्याचा प्रयत्न करणारा उमेदवार अपात्र ठरेल. यासंदर्भात निवड समितीचा निर्णय अंतिम असेल.

ज) निवड/नियुक्त्या ह्या उमेदवारांनी सर्व परीक्षा व मुलाखतीमध्ये मिळवलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेच्या क्रमाने काटेकोरपणे केल्या जातील.

झ) निवड यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल. त्यानंतर माननीय मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी मुदतवाढ न दिल्यास ही यादी व्यपगत होईल.

ञ) प्रतिक्षा यादी ही केवळ निवड यादीतून उमेदवार पदावर रुजू होण्यासाठी दिलेल्या विहित मुदतीत रुजू न झाल्यामुळे रिक्त झालेल्या किंवा निवड यादीतील उमेदवार पदावर रुजू झाल्यास परंतु त्याने/तिने निवड यादीच्या वैधता कालावधीत राजीनामा दिल्यास वापरात येईल.

ट) प्रतिक्षा यादी प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल. त्यानंतर माननीय मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी मुदतवाढ न दिल्यास ही यादी व्यपगत होईल.

ठ) 'शिपाई/हमाल' पदासाठी इयत्ता 7 वी चे गुण नमूद करणे बंधनकारक आहे. 'शिपाई/हमाल' पदासाठी जर उमेदवाराने इयत्ता 7 वी परीक्षा व पुढील उच्च पात्रता म्हणजे इयत्ता 8 वी, 9 वी, 10 वी किंवा 12 वी इत्यादी परीक्षा उत्तीर्ण केली असेल आणि त्याच्याकडे/तिच्याकडे इयत्ता 7 वी ची गुणपत्रक नसेल **तर त्याने/तिने ऑनलाइन अर्ज भरताना काल्पनिकरित्या इयत्ता 7 वी साठी 50% गुण (म्हणजे एकूण गुण '100' पैकी '50' मिळालेले गुण) प्रविष्ट करावेत** जेणेकरून त्याचा/तिचा अर्ज संगणकाद्वारे स्वीकारला जाईल. परंतु ज्या उमेदवाराने उच्च पात्रता म्हणजेच इयत्ता 8 वी, 9 वी, 10 वी किंवा 12 वी वगैरे परीक्षा उत्तीर्ण केली नसेल तर त्याने/तिने इयत्ता 7 वी मध्ये मिळालेल्या प्रत्यक्ष गुणांचा उल्लेख करावा आणि त्यासंदर्भातील किमान पात्रता प्रमाणपत्र संबंधित शाळेने जारी केलेले अपलोड करावे.

ड) अर्ज केलेल्या पदासाठी किमान पात्रतेचा तपशील जोपर्यंत उमेदवार प्रविष्ट करत नाही तोपर्यंत ऑन-लाईन अर्जाच्या पोस्ट ड्रॉप बॉक्समध्ये पोस्ट चा पर्याय दिसणार नाही म्हणजेच — शिपाई/ हमाल पदासाठी किमान पात्रता इयत्ता 7 वी आहे आणि या पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना इयत्ता 7 वीच्या गुणांचा उल्लेख करणे बंधनकारक आहे. लघुलेखक (श्रेणी-3) व कनिष्ठ लिपिक या पदांसाठी किमान पात्रता पदवी अशी आहे आणि या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना त्यांच्या पदवीच्या गुणांचा उल्लेख करणे बंधनकारक आहे.

RojgarMarathi.Com

ढ) अर्ज केलेल्या पदासाठी उमेदवाराने पात्रतेच्या निकषानुसार किमान अर्हता नमूद करणे बंधनकारक आहे. उमेदवाराकडे उच्च अर्हता असल्यास त्याला ते नमूद करण्याचे स्वातंत्र्य आहे.

ण) ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर उमेदवाराने **"I Agree"** च्या चेक बॉक्सवर क्लिक करून घोषणापत्रास संमती द्यावी आणि **"Submit Application"** बटण दाबून अर्ज सबमिट करावा. त्यानंतर अर्जात कोणतेही बदल/दुरुस्ती करता येणार नाही.

**दिनांक : 04 डिसेंबर , 2023.**

**सही/-**
**महाप्रबंधक**
**उच्च न्यायालय, मुंबई**

RojgarMarathi.Com

## <u>चारित्र्य प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती/कुमारी.................................................... श्री......................................... यांचा मुलगा/मुलगी/पत्नी, ........................... येथील रहिवासी असून, ते/त्या गेल्या ....... वर्षापासून माझ्या चांगल्या परिचयाचे आहेत. माझ्या माहिती आणि विश्वासानुसार त्याचे/तिचे नैतिक चारित्र्य चांगले आहे आणि त्याची/तिची वर्तणूक प्रतिकूल नाही. तो/ती माझा नातेवाईक नाही.

**ठिकाण :**

**दिनांक :**

**सही :** ____________________

**नाव :** ____________________

**पत्ता :** ____________________

____________________

____________________

____________________

**मोबाइल क्र.** ____________________

**********

RojgarMarathi.Com

# जिल्हानिहाय रिक्त पदे

**(06.09.2023 रोजी)**

| अनु. क्र. | जिल्हा न्यायालय | लघुलेखक (श्रेणी-३) | | कनिष्ठ लिपिक | | शिपाई/हमाल | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निवड यादी | प्रतिक्षा यादी | निवड यादी | प्रतिक्षा यादी | निवड यादी | प्रतिक्षा यादी |
| १ | अहमदनगर | ५५ | १४ | १४१ | ३५ | ६४ | १६ |
| २ | अकोला | १८ | ५ | ४८ | १२ | ३५ | ९ |
| ३ | अमरावती | २५ | ६ | १२८ | ३२ | ४२ | ११ |
| ४ | औरंगाबाद | १६ | ४ | ७७ | १९ | ४२ | १० |
| ५ | बीड | ११ | २ | ७२ | १८ | ३५ | ९ |
| ६ | भंडारा | ७ | २ | २९ | ७ | १६ | ४ |
| ७ | बुलढाणा | १५ | ४ | ७९ | २० | ४३ | ११ |
| ८ | चंद्रपूर | १९ | ५ | ६९ | १७ | ३५ | ९ |
| ९ | धुळे | ५ | १ | ३८ | ९ | १४ | ३ |
| १० | गडचिरोली | ५ | १ | ३२ | ८ | ८ | २ |
| ११ | गोंदिया | ५ | १ | ३४ | ९ | ११ | ३ |
| १२ | जळगाव | ६ | २ | ९२ | २३ | ३४ | ९ |
| १३ | जालना | ९ | २ | ३० | ८ | ११ | ३ |
| १४ | कोल्हापूर | ११ | ३ | ६१ | १५ | ३७ | ९ |
| १५ | लातूर | १० | ३ | ३६ | ९ | ३२ | ८ |
| १६ | नागपूर | २६ | ७ | १०७ | २७ | ३६ | ९ |
| १७ | नांदेड | १० | ३ | ५१ | १३ | २५ | ६ |
| १८ | नंदुरबार | १० | ३ | ३९ | १० | ३७ | ९ |
| १९ | नाशिक | ३८ | १० | १७८ | ४५ | ६१ | १५ |
| २० | उस्मानाबाद | ७ | २ | ६० | १५ | २६ | ६ |
| २१ | परभणी | १८ | ५ | १२१ | ३० | ४८ | १२ |
| २२ | पुणे | ५२ | १३ | १४४ | ३६ | ८६ | २२ |
| २३ | रायगड | १८ | ५ | ९७ | २४ | ५४ | १४ |
| २४ | रत्नागिरी | ८ | २ | ४९ | १२ | २० | ५ |
| २५ | सांगली | १४ | ४ | ३६ | ९ | १२ | ३ |
| २६ | सातारा | २४ | ६ | ६५ | १६ | २८ | ७ |
| २७ | सिंधुदुर्ग-ओरोस | ४ | १ | ३७ | ९ | २१ | ५ |
| २८ | सोलापूर | १५ | ४ | ६६ | १७ | २० | ५ |
| २९ | ठाणे | ४९ | १२ | २२९ | ५७ | ८४ | २१ |
| ३० | वर्धा | २० | ५ | २२ | ६ | ७ | २ |
| ३१ | वाशिम | १ | ० | ४७ | १२ | १८ | ५ |
| ३२ | यवतमाळ | २१ | ५ | १०७ | २७ | २६ | ७ |
| ३३ | शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय, मुंबई | ० | ० | २२९ | ५७ | १०१ | २५ |
| ३४ | मुख्य महानगर दंडाधिकारी कार्यालय, मुंबई | ४ | १ | ७४ | १९ | ३७ | ९ |
| ३५ | लघुवाद न्यायालय, मुंबई | १२ | ३ | ७१ | १८ | ६० | १५ |
| | **एकूण** | **५६८** | **१४६** | **२७९५** | **७००** | **१२६६** | **३१८** |

RojgarMarathi.com